दै. महाराष्ट्र टाइम्स

15 JUL 2017

# 'पीएमपी' आता एका क्लिकवर

## पासपासून 'ब्रेक डाउन'पर्यंत सर्वकाही

म. टा. प्रतिनिधी, पुणे

दैनंदिन पासपासून पुणे दर्शन बसचे तिकीट आरक्षित करण्यापर्यंत, पीएमपीचे दैनंदिन उत्पन्न, प्रवासी, मार्गावरील बसची संख्या, ब्रेक डाउनची संख्या यापासून मार्गावरील बसचे ट्रॅकिंग करण्यापर्यंतच्या विविध गोष्टींचा अंतर्भाव पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या नवीन वेबसाइटवर करण्यात आला आहे. त्यामुळे यापूर्वी केवळ नावालाच असणारी वेबसाइट आता खऱ्या अर्थाने नागरिकांच्या फायद्याची झाली आहे.

पीएमपीची pmpml.org ही वेबासाइट नव्याने करण्यात आली असून, ती गुरूवारी सर्वांसाठी खुली करण्यात आली. वेबसाइट प्रवासी केंद्रीत आणि सुटसुटीत आहे. बसचे नियमित वेळापत्रक, 'जर्नी प्लॅनर', रात्रसेवा, पुणे दर्शन, एअरपोर्ट सर्व्हिस, डॅशबोर्ड आणि 'सिटीझन कॉर्नर' या महत्त्वाच्या पर्यायांचा यामध्ये समावेश आहे, अशी माहिती पीएमपीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक तुकाराम मुंढे यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली.

पीएमपीमधील पारदर्शक कामाच्या दृष्टिने दररोज किती ट्रीपचे नियोजन करण्यात आले होते व प्रत्यक्षात किती ट्रीप झाल्या, दिवसभरात विक्री झालेल्या पासची संख्या, दैनंदिन प्रवाशांची संख्या, मार्गावरील बसची संख्या, प्रवाशांनी दाखल केलेल्या तक्रारी, त्यापैकी किती तक्रारी सोडविण्यात आल्या आदी माहितीचा 'डॅश बोर्ड' तयार करण्यात आला आहे. प्रवाशांच्या सोयीच्या दृष्टिने 'पीएमपी ई-कनेक्ट' ॲपमध्ये दिलेल्या सुविधांचाही या वेबसाइटवर समावेश करण्यात आला आहे, अशी माहिती मुंढे यांनी दिली.



### पीएमपी ई-कनेक्टमधील नवीन फिचर्स

- हे मोबाईल ॲप आता अँड्राइडबरोबरच 'आयओएस'वर उपलब्ध करून देण्यात आले आहे.
- सर्व प्रकारचे पास, पुणे दर्शन व एअरपोर्ट बसचे तिकीट आरक्षण ॲपद्वारे करता येणार
- यामध्ये नियमित बसचे वेळापत्रक समाविष्ट करण्यात आले आहे.

### पाच मिनिटाला बस !

पीएमपीच्या वेबसाइटवर आतापर्यंत 'व्हिजन' आणि 'मिशन'चा समावेश नव्हता. आता पहिल्यांदा त्याचा समावेश करण्यात आला असून, 'सार्वजनिक वाहतुकीच्या माध्यमातून विकास' यावर लक्ष केंद्रीत केले जाणार आहे. सुमारे पुणे-पिंपरी चिंचवड मधील सुमारे २० टक्के नागरिकांनी येत्या काळात पीएमपीने प्रवास करावा, अशी अपेक्षा आहे. त्यासाठी प्रवाशांना मुख्य मार्गांवर दर पाच मिनिटाला बस सेवा उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. काही महिन्यांपूर्वी ते प्रमाण १५ मिनिटांचे होते.